
अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरूवार, दि. २३ मार्च २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १७३ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## भारत २१ धावांनी पराभूत, मालिकाही २-१ ने गमावली

✔ **चेन्नई** : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा आणि निर्णायक सामना भारताने गमावला आहे. २७० धावाचं लक्ष्य गाठताना २४८ धावांवर भारत सर्वबाद झाल्यामुळे २१ धावांनी सामना भारताला गमवावा लागला आहे. तीन सामन्यांच्या मालिकातील सलग दुसरा सामना भारताने गमावल्यामुळे मालिकाही भारताने गमावली आहे. विशेष म्हणजे २०१९ नंतर पहिल्यांदाच भारताने घरच्या मैदानावर मालिका गमावली आहे. चार वर्षात मालिका भारतानं घरच्या मैदानावर जिंकल्या असून दोन मालिका ड्रॉ देखील झाल्या आहेत.

# श्री तुळजाभवानी मंदिराचे रूप पालटणार, एक हजार कोटींचे दान पदरात पडणार

## ▪ पंतप्रधान मोदींनी शब्द पाळला, विकासाचा मार्ग मोकळा

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानीच्या मंदिराचे रूप पालटणार आहे. केंद्र सरकारने एक हजार कोटींचा विकास आराखडा तयार केला असून तिरूपती आणि शिर्डीच्या धर्तीवर तुळजापूरला येणाऱ्या भाविकांना साऱ्या सुविधा प्राप्त होणार आहेत. ऐतिहासिक वरदार असलेल्या तुळजापूर शहराच्या परिसरातील संपूर्ण भागाचा विकास केला जाणार असून या विकास आराखड्यातून धार्मिक पर्यटनाला मोठी चालना दिली जाणार आहे.**

केवळ महाराष्ट्रच नव्हेतर तर अन्य राज्यांमधूनही श्रीतुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी असंख्य भाविक दररोज येत असतात. लग्न सराईत तर मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी असते. ही गर्दी पाहाता सुलभ दर्शनाची म्हणावी तशी सोय नाही. इतर सोयींचाही अभाव आहे. त्याचा विचार करून केंद्र सरकारने प्रसाद या विशेष योजनेतून हा विकास आराखडा तयार केला आहे.या आराखड्यात तुळजापुरात येणाऱ्या प्रत्येक प्रमुख मार्गावर शहराबाहेर म्हणजे नळदुर्ग रोड, हुडको, आराधवाडी भागात पार्किंग सुविधा असेल. सध्याच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येतील. त्याचठिकाणी भाविकांचे साहित्य ठेवण्याची सोय करण्यात येणार आहे. दर्शन अधिक सुलभ करण्यासाठी तसेच भाविकांच्या वेळेची बचत व्हावी, यासाठी शिर्डी, तिरूपती देवस्थानच्या धर्तीवर बदल करण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांचा वेळ वाचेल आणि गर्दीचेही नियंत्रण होईल. नव्या योजनेमुळे दर्शनासाठी आपला नंबर कधी येणार हे भक्तांना आधीच कळणार आहे. त्यासाठी वाहन पार्किंग परिसरातच काऊंटर पास दिले जातील. त्यावरील वेळेनुसार तासभर आधी मंदिर आवारात भाविकांना प्रवेश मिळेल. दर्शन लाईन प्रकल्पातून टप्प्याटप्प्याने भाविकांना थेट मंदिरात सोडले जाणार आहे.

### कसा असेल विकास आराखडा?

▸ नव्या आराखड्यात वातानुकुलित सभागृहातून दर्शनाची रांग असणार आहे. ▸ एकूण १० वातानुकुलित सभागृह आहेत. ▸ या सभागृहांची क्षमता ही एक लाख भाविक इतकी असेल. ▸ एका सभागृहातून दुसऱ्या सभागृहात पाठवून भाविकांना टप्प्याटप्प्याने मंदिरात सोडले जाईल ▸ दर्शनाला किती वेळ लागेल हे आधीच कळणार आहे. ▸ वाहन पार्किंगच्या ठिकाणीच काऊंटर पास मिळेल. ▸ भाविकांना मंदिर परिसरात तासभर आधी प्रवेश मिळेल. ▸ मंदिर परिसरातील बांधकामात बदल होणार आहेत.

### छत्रपतींचेही दर्शन घडणार



तुळजापूर शहरालगत रामदरा परिसरात उद्यान साकारले जाणार आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे. शहरात येणाऱ्या प्रत्येक प्रमुख मार्गावर आता दगडी कमानी उभारण्यात येतील. शासनाकडे प्रस्ताव पाठवून मान्यता आल्यानंतर गरजेनुसार बदल केले जातील. यापूर्वी ३२५ कोटींचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा राबविण्यात आला होता. यातून तुळजापूर शहराचा पुरेसा विकास झाला नाही.



### देर है, लेकिन अंधेर नही.

महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या तुळजाभवानी मातेच्या शक्तीपीठाला विकासाची प्रतीक्षा आहे. अलीकडच्या काळात मंदिरात वाढलेली गर्दी आणि कमी पडत असलेल्या सुविधांच्या पार्श्वभूमीवर विकास आराखडा राबविण्याची गरज व्यक्त झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये तुळजापुरात झालेल्या प्रचारसभेत मंदिराच्या विकासाची ग्वाही दिली होती. त्यानंतर नऊ वर्षांनी यासंदर्भातील हालचाली सुरू झाल्या आहेत. भगवान की घर देर है,लेकिन अंधेर नाही,अशी एक म्हण आहे. मोदींनी शब्द दिला होता परंतु उशीरा का होईन त्याची पूर्तता केल्यामुळे भाविकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे.

### काय आहे प्रसाद योजना?

केंद्र सरकारची ही योजना पर्यटन विभाग राबवत असते. भारतातील धार्मिक पर्यटनाच्या विकासासाठी आणि प्रोत्साहनासाठी मार्ग प्रशस्त करणे आहे, हा या योजनेमागचा उद्देश आहे. केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर पर्यटन मंत्रालयाच्या अंतर्गत २०१४-२०१५ मध्ये तीर्थक्षेत्र पुनरुज्जीवन आणि आध्यात्मिक संवर्धन ड्राइव्ह योजना सुरू केली होती. 'तीर्थक्षेत्र कायाकल्प आणि आध्यात्मिक संवर्धन ड्राइव्ह' हे प्रसाद उपक्रमाचे पूर्ण नाव आहे. हा कार्यक्रम धार्मिक पर्यटन वाढविण्यासाठी भारतातील तीर्थक्षेत्रे तयार करणे आणि ओळखणे यावर लक्ष केंद्रित केले जाते. तीर्थक्षेत्रांना प्राधान्याने, संघटित आणि शाश्वत पद्धतीने एकत्रित करून सर्वांगीण धार्मिक पर्यटन अनुभव देणे हे या योजनेचे ध्येय आहे.

## खासगी बसचालकांकडूनही महिलांसाठी ५० टक्के सवलत

### ▸ चंद्रपूर-गडचिरोली ट्रॅव्हल्स असोसिएशनचा निर्णय



✔ **चंद्रपूर** : राज्यातील महिलांसाठी राज्य सरकारने राज्य परिवहन महामंडळाच्या म्हणजेच एसटीच्या बसमधून प्रवासासाठी ५० टक्के सवलत दिली आहे. आता खासगी बसचालकांनीही महिलांसाठी ५० टक्के सवलत देऊ केली आहे. चंद्रपूर-गडचिरोली ट्रॅव्हल्स असोसिएशनने या संदर्भातील घोषणा केली आहे.

आजपासून या निर्णयाची अंमलबजावणी झाली आहे. चंद्रपूर-गडचिरोली ट्रॅव्हल्स असोसिएशनने यासंदर्भात मंगळवारी बैठक घेतली होती. या बैठकीत महिलांना ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात चर्चा झाली. या चर्चेनंतर सवलत देण्याविषयी निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे, आज गुढीपाडव्यापासूनच या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे. महिला सन्मान योजनेअंतर्गत राज्य सरकारने विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एसटीच्या सर्व बसमध्ये ५० टक्के सवलत देण्याची घोषणा केली. फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना याबाबत घोषणा केली होती. राज्यभरातील महिला वर्गाकडून या योजनेला सकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या असून हजारो महिला प्रवाशांनी या सवलतीचा लाभही उचलला आहे. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या महिलांना या योजनेचा लाभ होणार आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसेस राज्यातील सर्वच कोपऱ्यात सेवा देतात.परंतु, अनेक ठिकाणी एसटी बसेसच्या फेऱ्या कमी असल्याने प्रवाशांना खासगी वाहतुकीचा वापर करावा लागतो. एसटी महामंडळाने महिलांना सवलत देण्याचा निर्णय घेतल्याने अनेक खासगी बसचालकांनीही यासंदर्भात निर्णय घेतला आहे. त्यानुसार, चंद्रपूर-गडचिरोली ट्रॅव्हल्स असोसिएशनने निर्णय जाहीर केला आहे.

## विषप्राशन केलेल्या तरुणीचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

आई वडिलांच्या भांडणास कंटाळून विष प्राशन केलेली मुक्ता अरुण भाग्यवंत (वय १७ रा.तोंडले बोंडले ता.माळशिरस) ही अल्पवयीन तरुणी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी सकाळी मयत झाली.

नऊ मार्च रोजी तिने राहत्या घरात हा प्रकार केली होती. तिला प्राथमिक उपचार करून गणेश भाग्यवंत (काका) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## उजनी अडीच महिन्यातच 'निम्म्यावर'

### १२ तासांत एक टक्का पाणी पातळी घट; 'मे'अखेरीस तळ गाठण्याची शक्यता?

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्याचे वरदायिनी असणारे उजनी धरण जानेवारीच्या सुरवातीला १०५ टक्क्यांवर असणारे अडीच महिन्यांत धरणातील तब्बल २६ टीएमसी म्हणजेच ४९ टक्के पाणी संपले असून सोलापूर शहराला पिण्याच्या पाण्यासाठी भीमा नदीतून पाणी सोडले असून, शेतीसाठी सोडलेले पाणी १० मेपर्यंत सुरूच राहणार आहे. त्यामुळे मे अखेरीस धरण तळ गाठण्याची शक्यता आहे.

### गाळ पाहणीसाठी केंद्रीय पथक धरणावर

उजनी धरणात सद्य:स्थितीत १४ टीएमसी गाळ आहे. धरणातील गाळ काढण्यासाठी आता मंजुरी मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर सेंट्रल वॉटर कमिशनच्या माध्यमातून गाळाचा सर्व्हे केला जात आहे.१८ मार्च रोजी कमिशनचे अधिकारी उजनी धरणावर दाखल झाले असून मागील पाच दिवसांपासून गाळाचा अंदाज घेतला जात आहे. त्यांचा रिपोर्ट अंतिम झाल्यानंतर गाळ काढण्याची प्रक्रिया पार पडणार आहे.



### शेतीसाठी १० मेपर्यंत सुरुच राहणार पाणी.

उन्हाळ्यच्या पार्श्वभूमीवर उजनी धरणातून पहिल्यांदाच कालवा सल्लगार समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शेतीसाठी १० मे पर्यंत सलग पाणी सोडले जाणार आहे. सध्या उजवा व डावा कालवा, कॅनॉल (३००० क्युसेक), बोगदा (१००० क्युसेक), दहिगाव (१२० क्युसेक) आणि सीना-माढा उपसा सिंचन (३३३ क्युसेक) योजनेतून सध्या शेतीसाठी पाणी सोडले जात आहे.वेगवेगळ्या भागातील शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने ते पाणी सोडले जात आहे. दुसरीकडे सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून सहा हजार क्युसेकने पाणी सोडले आहे. ३१ मार्च रोजी ते पाणी बंद केले जाणार आहे.

### सोलापूर जिल्ह्यातील तापमानात वाढ

वाढ होत आहे. बाष्पीभवनामुळे देखील धरणातील पाणी कमी होऊ लागले आहे.भीमा नदी व कॅनॉल, बोगदा आणि उपसा सिंचन योजनांमधून पाणी सोडल्याने १२ तासांत एक टक्का पाणी पातळी घटत आहे. सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून सोडलेले पाणी ३१ मार्चपर्यंत सुरूच राहणार असल्याने मार्चअखेर धरणातील पाणीसाठा ३९ टक्क्यांवर येईल.तेथून शेतीसाठी सोडलेले पाणी १० मेपर्यंत सुरूच राहणार असल्याने पाणीसाठा १० टक्क्यांपेक्षाही कमी होऊ शकतो.. त्यामुळे पावसाळा सुरू होण्यापूर्वी धरण मायनसमध्ये जाईल, अशीही शक्यता वर्तवली जात आहे.कारण, मे महिन्यात सोलापूर शहरासाठी पुन्हा एकदा भीमा नदीतून पाणी सोडावे लागणार आहे.

## जुना तुळजापूर नाका येथील अपघातात शासकीय कर्मचारी ठार

✔ सुराज्य/सोलापूर



जिमसाठी दुचाकी वरून जात असताना अनोळखी वाहनाच्या धडकेने उजनी पाटबंधारे विभागातील कर्मचारी गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात जुना तुळजापूर नाका येथे घडला.

संतोष उद्धव कांबळे (वय ३८ रा.भिम नगर, तळेहिप्परगा) असे मयताचे नाव आहे. ते आज सकाळी ६ वाजेच्या सुमारास दुचाकीवरून जिम साठी शहराकडे निघाले होते. तुळजापूर नाका येथील चव्हाण शोरूम जवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना पोलीसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वीच मयत झाले. मयत संतोष कांबळे हे उजनी पाटबंधारे विभागात कामाला होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. या अपघाताची नोंद जोडभावीपेठ पोलिसात झाली. हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत.


## चितेतील आगीच्या भडक्याने वृद्ध भाजून जखमी

### बोरामणी येथील घटना

✔ **सोलापूर** : चिता पेटवल्यानंतर आगीच्या भडक्याने वृद्ध इसम भाजून जखमी झाले . ही घटना बोरामणी (ता.दक्षिण सोलापूर) येथील स्मशानभूमीत बुधवारी सकाळच्या सुमारास घडली. अशोक माणिक वाघमारे (वय ६२ रा. बोरामणी) असे जखमीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी अनिल वाघमारे (मुलगा) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. गावातील एका इसमाचे निधन झाल्यामुळे अशोक वाघमारे हे अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीत गेले होते. चिता पेटवल्यानंतर ते बाजूला थांबले होते. लाकडाची सारवा सराव करताना आगीच्या भडक्याने त्यांच्या अंगावरील कपडे पेटल्याने ते जखमी झाले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




खुर्च्या वाढवाव्या लागतील...


कल्याण
550-07-566

मेन बाजार
--------


## सोने-चांदी, रिअल इस्टेट, वाहन खरेदीत कोट्यवधींची उलाढाल

### ▪ पाचशे ई-बाईक्सची खरेदी; महिलांना दागिन्यांची हौस न्यारी

✔ **सोलापूर** : साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढीपाडवा सणाच्या निमित्ताने बुधवारी सर्वच बाजारपेठा नागरिकांच्या गर्दीने फुलून गेल्या होत्या. सोने-चांदी, रिअल इस्टेट आणि दुचाकी व चारचाकी वाहन खरेदीत कोट्यवधींची उलाढाल झाली. दुचाकी वाहन खरेदीत वाढत्या इंधन दरामुळे जास्तीचे मायलेज व ई बाईक्सला ग्राहकांनी पसंती दिल्याचे दिसून आले. पाडव्याच्या मुहूर्तावर शहरात सुमारे पाचशेहून अधिक ई बाइक्स रस्त्यावर आल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. दरम्यान, सोन्याच्या भावात एक हजारांनी घट झाल्याने नागरिकांचा सोने खरेदीसाठी उत्साह दिसून आला. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर केवळ वाहन खरेदीची उलाढाल शंभर कोटींवर गेल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.



शुभमुहूर्तावर किमान एक गुंज तरी सोन्याची खरेदी करावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यानुसार अपेक्षेप्रमाणे बुधवारी सराफ बाजारात सोने आणि चांदी खरेदीसाठी विशेषत: महिला वर्गाची झुंबड उडाली होती. योगायोगाने सोन्याच्या दरातही कालच्या (मंगळवार) तुलनेने एक हजाराची घसरण झाली होती. हा दिलासादायक योग साधत अनेकांनी सोने खरेदी केली. यात कलाकुसरीच्या दागिन्यांना ग्राहकांतून अधिक पसंती होती. मंगळवारी सोन्याचा प्रतितोळा दर ६० हजार रुपये होता. बुधवारी मात्र दरात घसरण होऊन तो ५९ हजारावर स्थिरावला. चांदीच्या दरात मात्र कसलाही चढ उतार नव्हता. चांदीचा प्रतिकिलो दर ७० हजार रुपये इतका होता. सोन्याच्या दरात झालेल्या घसरणींचा ग्राहकांनी लाभ उठविला. सोने खरेदीतील गुंतवणूक ही चांगला परतावा देणारी असल्याने ग्राहकांचा सोने खरेदीकडे अधिक कल दिसून आला. रिअल इस्टेट अर्थात तयार घरे, खुल्या जागा खरेदीलाही चांगला प्रतिसाद मिळाला.

बांधकाम व्यावसायिकांनी शहराच्या विविध भागात बहुमजली इमारती उभ्या करून त्यात ग्राहकांच्या पसंतीनुसार व गरजेनुसार वन बीएचके व टु बीएचके घरे उपलब्ध करून दिली आहेत.

▸ दुचाकी व चारचाकी वाहन उद्योगात कोट्यवधींची उलाढाल झाली. विविध कंपनीच्या सुमारे तीन हजाराहून अधिक दुचाकी व एक हजाराहून अधिक चारचाकी वाहने रस्त्यावर आली. शहरातील चव्हाण शोरूम, लक्ष्मी ऑटोमोबाईल्स, मोंढे, गांधी टीव्हीएस, कायझन होंडा, बजाज, सुझुकी ही दुचाकींची शोरुम्स हाऊसफुल्ल होती. दुचाकींशिवाय राहुल ह्युंदाई, टाटा मोटर्स, चव्हाण मोटार्स आदी चारचाकी शोरूमही ग्राहकांनी गजबजून गेली होती. त्यामुळे आता रस्त्यावर वाहनांची संख्या वाढणार आहे.

▸ इलेक्ट्रॉनिक्स बाजारातही लाखो रुपयांची उलाढाल झाली. ग्राहकांनी एलईडी टी.व्ही., फ्रीज, वॉशिंग मशीन, कुलरची जोमाने खरेदी केली. वाढत्या उन्हापासून बचाव करण्यासाठी ग्राहकांनी वातानुकूलित उपकरणांना पसंती दिली. व्होल्टास, एलजी, ओनिडा, पॅनासॉनिक, हायर, आयएफबी अशा अनेक कंपन्यांच्या वातानुकूलित उपकरणांनी ग्राहकांचे लक्ष वेधले. इलेक्ट्रॉनिक्स बाजारात मोबाइलची सर्वाधिक विक्री झाली. नवी पेठेतील मोबाइल मार्केटमध्ये तुंडूंब गर्दी झाली होती. विक्रेत्यांनी जाहीर केलेल्या विविध सवलत योजनांचाही ग्राहकांना चांगला लाभ झाला. गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यंदा बाजारात चांगली उलाढाल झाल्याचे झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.